# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,

प्रत्र क.रासेयो २९५/२०१७—२०१८
दिनांक :— ११/०८/२०१७.

प्रति,
प्राचार्य,
............................................
............................................

विषय:— "महा अवयवदान अभियान २०१७" करिता कार्यक्रमाचे आयोजन करणे बाबत . .

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दिनांक २९ व ३० ऑगष्ट २०१७ दरम्यान अवयवदान जनजागृती करिता "महा अवयवदान अभियान २०१७" महाविद्यालय स्तरावर आयोजित करणेबाबत शासन स्तरावर नियोजित करण्यात आले आहे. सदर राज्यस्तरीय महा अवयवदान अभियानात विविध कार्यक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले आहे. तथापी सदर अभियानादरम्यान महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत महा अवयवदान अभियान संदर्भात खालील प्रमाणे विविध उपक्रम राबविण्यात यावेत.

-: कार्यक्रमाची जंत्री खालील प्रमाणे :-

| क्र. | दिनांक | उपक्रम |
|---|---|---|
| १ | १८.०८.२०१७ | पोस्टर स्पर्धा |
| २ | १९.०८.२०१७ | रांगोळी स्पर्धा |
| ३ | २०.०८.२०१७ | निबंध स्पर्धा |
| ४ | २१.०८.२०१७ | वक्तृत्व स्पर्धा |
| ५ | २२.०८.२०१७ | चित्रकला स्पर्धा |
| ६ | २३.०८.२०१७ | व्याख्यानांचे आयोजन |
| ७ | २४.०८.२०१७ | चर्चासत्रांचे आयोजन |
| ८ | २५.०८.२०१७ | कार्यशाळांचे आयोजन |
| ९ | २६.०८.२०१७ | जनजागृती आयोजन |
| १० | २७.०८.२०१७ | पथनाटयांचे आयोजन |
| ११ | २८.०८.२०१७ | इतर उपक्रमांचे आयोजन |
| १२ | २९.०८.२०१७ | रॅली व अवयवदान शपथ |
| १३ | ३०.०८.२०१७ | दीक्षस समरंभ व समारोप |

कार्यक्रमाचा अहवाल या विभागास पाठविण्यात यावा.

आपला विश्वासू

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक रासेयो, विभाग

## अवयवदान प्रतिज्ञा

भारताचा एक सुजाण नागरिक म्हणून मी शपथ घेतो की, अवयवरुपी जीवनदान देऊन आपले जीवन सार्थ करेल.

अवयवदान ही जीवनाची, कुटुंबाची आणि समाजाची मोठी गरज आहे. मी स्वतः अवयवदानासाठी कटिबध्द होऊन दुसऱ्यांना प्रेरित करेल व अवयवदान ही एक भारतीय संस्कृतीची ओळख म्हणून जपवणूक करेल.

मी समाजात **"अयवदान हे जीवनदान"** हि संकल्पना रुजवेल.

समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत हा संदेश पोहचविण्याचे कार्य मी करेल.

**"मरावे परी किर्तीरुपी उरावे, मरावे परी अवयवरुपी उरावे"** ही ऊक्ती मी माझ्या शहरासाठी, देशासाठी आणि विश्वासाठी सार्थ करेल.

मी अवयवदानावददल संपुर्ण माहिती घेऊन, अन्य शंभर व्यक्तींना मला शक्य होईल तेव्हा महत्व पटवून देण्याचा अथक प्रयत्न करेल.

मी माझ्या देशासाठी अवयवदान जागृतीसाठी प्रयत्नशील राहील.

❖❖❖❖❖